महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय आरोग्य अभियान, नाशिक मंडळ,
नाशिक.

| ☎ दुरध्वनी क्रमांक | कार्यालय |
|---|---|
| कार्यालय :<br>कार्यकारी अभियंता : ०२५३ - २५९७९५६ | उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक.<br>विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय परिसर, शालीमार,<br>नाशिक ४२२ ००१. |

६७१-६७५/
प.क्र.उपसंआसे/काअ/एनएचएम/पासूविक/ /१६
दिनांक :- १६/१२/२०१६

## कार्यारंभ आदेश

प्रति,
**मे.आर.के.कन्स्ट्रक्शन्स**
प्रो.प्रा.महेंद्रमोहन रामदास पाटील
रा.रामकमल गितांजली सोसायटी जवळ,
पंपीग स्टेशन,गंगापूर रोड,नाशिक.

**विषय** :- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रा.आ.केंद्र नायडोंगरी ता. **नांदगांव** जि.नाशिक येथील नविन मुख्य इमारत बांधकाम करणे.

**संदर्भ** :- १) या कार्यालयाची ई निविदा सुचना क्रं.१/१६-१७,निविदा क्रं.2016_NHM_152795_1
२) आपले कडून प्राप्त निविदा
३) या कार्यालयाचे पत्र क्र. उपसंआसे/एनएचएम/पासुविक/६१८-६१९/१६ दि.११/११/२०१६
४) मा. अधिक्षक अभियंता, रा.आ.अ.,रा.आ.सो. मुंबई यांची मंजूर टिपणी दि.१४/१२/२०१६

१) आपण या कामाचे आवश्यक करारपत्र पूर्ण केले आहे. उपरोक्त संदर्भ क्रं.२ नुसार आपली रक्कम रु.२,०६,४२,७४७/- ची निविदा १०.५०% कमी दराने स्विकारण्यात येत आहे.

२) आपणाकडून देय असलेल्या **रु.१०,३२,१३७/-** अनामत रक्कमेपैकी आपण **रु.६,१९,२८२/- (१% +२%)** एवढी रक्कम भरली असून उर्वरीत रक्कम **रु.४,१२,८५५/-** आपले कामाच्या देयकातून सम प्रमाणात वसूल करण्यात येईल.

३) सदर कामाचा करारनामा क्र.B-1/01/2016-17/PHC असा आहे. या पुढील पत्रव्यवहारात सदर करारनामा क्रमांक नमुद करावा.

४) काम सुरु करण्याचा दिनांक हया पत्राच्या दिनांकापासून धरणेत येईल व सदर कामाचा पूर्ण करण्याचा कालावधी १२ (बारा) महिने राहील. (१२ Calender months)

५) सदर कामाचा दोष उणीवा, दायित्व कालावधी (Defect Liability Period) १२ महिने राहील.

६) कामाचे देयक अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

७) गौण खनिजापोटी रॉयल्टी भरल्याचे चलन बिलासोबत सादर करावे. अन्यथा रॉयल्टी रक्कम बिलातून वजा करण्यात येईल.

८) कामावर नियुक्त करण्यात येणा-या कामगारांचा व कंत्राटी कामाचा शासकीय विमा, संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा १ % रक्कम प्रथम देयकातून वजा करुन विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे भरणा करण्यात येईल.

९) सदरचे काम आपणास B.1 Agreement तसेच Specification मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून करणे बंधनकारक राहील.

१०) सदरचे काम आपण स्वत:च केले असल्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे मागणी केल्यास सादर करणे आपणावर बंधनकारक राहील.

११) उपरोक्त काम आपण उपअभियंता, पायाभुत सुविधा विकास कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद,नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली त्वरीत सुरु करावे.

१२) सदर कामाचा दर्जा व काम समाधानकारक न आढळल्यास कामाचा ठेका रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

१३) सदरचे काम सुरु करणेपूर्वी व झालेनंतर विविध टप्प्यातील कामाचे फोटो सादर करण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता**
**पायाभुत सुविधा विकास कक्ष,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान,**
**नाशिक मंडळ, नाशिक**

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.अधिक्षक अभियंता,राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई.
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नाशिक.
३) मा.जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.नाशिक.

**प्रत :- पुढील उचित कार्यवाहीस्तव.**

उपअभियंता,पायाभुत सुविधा विकास कक्ष, रा.आ.अ,. जिल्हा परिषद,नाशिक